पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २/४/२०१९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. १**

क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/३/२०१९ ते दि.१५/३/२०१९ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप/२/१६६८ दि.२०/३/२०१९ चे पत्र.

हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ धानोरी सन २०१६–२०१७ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२९०२ दि.२५/३/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २८ सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. ३**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सन २०१५–२०१६ मधील पेठ वारजे अे फॉर्म क्र.२८९५ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी करीत असताना अे फॉर्म क्र.१०२३ सन २०१७–२०१८ भोगवटापत्र क्र. ०२४६४ दि.१/१२/२०१४ या मधील सदनिकांची आकारणी न केल्याने आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२९२० दि.२७/३/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. २९ सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

**विषय क्र. ४**

मा.आरोग्य प्रमुख यांचे नियंत्रणाखालील अन्न परवाना विभागाचे सन २०१३–१४ ते २०१७–२०१८ अखेर महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ अंतर्गत लॉजिंग, मंगल कार्यालय, सलून, ब्युटी पार्ल इत्यादी व्यवसायांचा परवाना रजिस्टरची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२९२१ दि.२७/३/२०१९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३० सन २०१८–२०१९ चा विचारासाठी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**